


NEHRU BAL PUSTAKALAYA

# आपल्या उपयोगाची झाडं

के. एस. शेखरन्



ISBN 81-237-0473-9

पहिली आवृती 1983 (शके 1903)
सहावे पुनर्मुद्रण 1993 (शके 1915)

© के. एस्. शेखरन्, 1982

रु. 9.00

Our Useful Plants (*Marathi*)

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले

**Printed at Bankers Press, A-18-A, Naraina Industrial Area, Phase II, New Delhi- 110 028.**


नेहरू बाल पुस्तकालय



# आपल्या उपयोगाची झाडं

मूळ तेलुगु लेखक : के. एस. शेखरन्
मराठी अनुवाद : शर्मिला कारखानीस
चित्रे : पुलक विश्वास

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया




आई, बाबा, धाकटा भाऊ,
मोती आणि मी
आम्ही सगळे एकाच कुटुंबातले.






आठवतंय्, आपण एकदा प्राणी संग्रहालय
बघायला गेलो होतो?
आपल्याला मोतीचे मित्र भेटले,
आणि आपण वाघ, चित्ते, माकडे आणि झेब्रे
सुध्दा पाहिले...
सगळे कसे पिंजऱ्यातून डोकावून बघत होते.








माझ्या खिडकीतून
मला झाडेच झाडे दिसतात.
आमच्या घराभोवती किनई
खूप रोपे आहेत.
आणि आमच्या बागेत पेरूचे झाड पण आहे
लहान लहान असतात त्यांना रोपे म्हणतात
म्हणजे माझ्यासारखी छोटी असतात ना,
ती रोपे.
आणि बाबा म्हणतात,
त्यांच्यासारखी मोठ्ठी असतात,
त्यांना झाडे म्हणतात.







हे गुलाब आम्ही गेल्या वर्षी लावले.
पहा, कशी छान फुले आली आहेत...
मार्गशीर्षात याच्यापेक्षाही जास्त थंडी पडली
तरी सगळीकडे पिवळाजर्द सोनेरी झेंडू फुलेल...



आमच्या मागच्या अंगणात आंब्याचेही झाड आहे...
मी अगदी लहान होते, तेव्हापासून ते तिथेच आहे.
बाबा लहान होते, तेव्हाही ते झाड मोठ्ठेच होते म्हणे!
ते कधीपासून तिथे आहे कुणास ठाऊक.
ते कधी लावले हे माझ्या आजोबांनाही
आठवत नाही.
आपण जसे मोठे होतो, तशीच रोपे आणि
झाडेही वाढतात,
तसाच मोती ही!








प्रत्येक गोष्ट का वाढते, मोठी होते?
चित्ता, वाघ, गाय, बैल, मोती
आणि इतर सगळेच प्राणी
शिवाय गुलाब, झेंडू जाई आणि जुई
झालेच तर आंबा आणि आपल्याला दिसणारी
सगळीच झाडे आणि रोपे,
सगळयांमधे जीव असतो आणि इतर
सजीव प्राण्यांसारखीच ती असतात.


प्रत्येक सजीवाला जगण्यासाठी खावेच लागते.
आणि जे खातात त्यांची वाढ होतेच.
म्हणून तर मी खायला नको म्हटले
की आई म्हणते, ''तू खाल्लेच नाहीस
तर तुझी वाढ कशी होणार?''




आपण सगळेजण खातो,
तसेच मोतीलाही खायला लागते
आणि कोणी पाहात नसताना
मनीमाऊ दूध गट्टम् करते (मग वर
दंडुक्याचा मारही खाते.)



वाघ, सिंह, चित्ते मांस खातात.
(आपण प्राणिसंग्रहालयात त्यांना खाताना पाहिले.)




गुलाब, झेंडू चाफा आणि आंबा,
यांना देखील जीव असतो–हो की नाही?
ते पण सगळे वाढतात, मोठे होतात,
मग ते काय खातात बरे?







रोपांना जमीन लागतें.
रोपांना सूर्यप्रकाश लागतो.
रोपांना हवा आणि पाणीसुध्दा लागते.

आई आपल्यासाठी कणकेच्या पोळया करते.
त्याच्या जोडीला आपण हिरव्या पालेभाज्या खातो.
दोन्ही मिळून आपले जेवण तयार होते.
पण तुम्हाला ठाऊक आहे?
गुलाब, झेंडू, चाफा आणि आंबा
तशीच इतर सगळी झाडे आणि रोपे
त्यांचे अन्न स्वतःच तयार करतात.






ही सगळी झाडे आणि रोपे
जमिनीतले पाणी शोषून घेतात.
आणि श्वसही घेतात—अगदी आपल्यासारखा.
आकाशात सूर्य असेपर्यन्त
पानांमधील हिरेवपणा म्हणजेच त्यांचे अन्न.
ते त्यांचे अन्न स्वतः तयार करतात.




गुलाब, चाफा आणि आंबा हे नेहमी
बाहेरच उगवतात.
खोलीत किंवा स्वयंपाकघरात
कधीच उगवत नाहीत.
असे का बरे?

कारण
तुम्ही त्यांना सूर्यप्रकाशापासून
दूर ठेवलेत किंवा उपटलेत
तर ती स्वत:साठी अन्न तयार
करू शकत नाहीत आणि वाढतही नाहीत.
ती कोमेजून मरून जातील.



मोठे घर असले की आपण स्वयंपाकघरात
अन्न शिजवतो.
आंब्याचे झाडही खूप मोठे असते.
ते त्याचे अन्न कुठे तयार करते?
सगळ्या झाडांची पानेच अन्न तयार करतात.
सगळ्या झाडांमधे
त्यांची पाने हेच त्यांचे स्वयंपाकघर असते.
तेथेच झाडांचे अन्न तयार होते.




भरपूर पाने असली की
साहजिकच झाडे भरपूर अन्न तयार करतात.
झाड जेवढे मोठे, तेवढे त्याला खायलाही जास्त लागते.
म्हणूनच मोठे झाड असले, की त्याला पानेही
जास्त असतात.
आणि म्हणून तर पाने गळून पडली की
झाडाची जास्त वाढ होत नाही.
माळी जरी म्हणतो की,
वारंवार थोडीशी छाटणी केल्याने
रोपांना आणि झाडांना नवीन जीवन मिळते.
तरी ती फार काळजीपूर्वक करायला हवी.



आईने आपल्याला शेंगदाणे दिले
की आपण थोडेसे खातो
आणि बाकीचे नंतर खाण्यासाठी खिशात ठेवतो.
अगदी तस्सेच
रोपांना पुरेसे खाद्य मिळाले की
ती बाकीचे उरलेल अन्न
दुसऱ्या वेळेसाठी ठेवून देतात.






काही वनस्पती त्यांचे जास्तीचे अन्न
जमिनीत साठवतात.
उदाहरणार्थ गाजरे, बटाटे, शेंगा (भुईमूग) वगैरे.
(मी तुम्हाला एक गुपित सांगते,
आजोबा सुध्दा किनई त्यांचे पैसे असेच
कपाटात लपवून ठेवतात.)

काही काही झाडे अशी आहेत–
ती त्यांचे जास्तीचे अन्न आपल्या हाताला
लागणार नाही असे ठेवतात.
(आई सुध्दा लाडू केले की ते आपल्याला घेता येऊन नयेत
म्हणून उंच फळीवर ठेवून देते.)





आपल्याला भूक लागली की
आपण त्यांचे अन्न हिसकावून घेतो आणि खातो.
काही प्राणी सुध्दा आपल्यासारखेच करतात.
शेळ्या पाने ओरबाडतात.
गाई म्हशी गवत खातात.
हत्ती तर झाडांच्या अख्ख्या फांद्याच गिळतो.
हरणे सुध्दा झाडे आणि रोपांशिवाय जगणार नाहीत

हरणे नसती तर
वाघ चित्ते जगू शकले नसते.
एकंदरीत काय तर मांसाहारी प्राण्यांना सुध्दा
जगण्यासाठी वनस्पतींची गरज असते.
थोडक्यात आपण असे म्हणू याः
"झाडांचा नि रोपांचा हो उदंड विस्तार
करूया हिरव्या वनराजीचा अखंड जयजयकार!"






आपण रोज गव्हाच्या पिठाच्या पोळ्या खातो.
पण गहू काही आपल्याला स्वतः तयार करता येत नाहीत.
वांगी, भेंडी, कारली, गवार वगैर रोपे जे
स्वतःचे अन्न तयार करतात ते आपण
भाजी म्हणून खातो.
बिचारी अन्न तयार करण्यासाठी
इतके कष्ट करतात
आणि आपण ते काढून घेतो, शिजवतो आणि खातो.
प्राण्यांना अन्न शिजवता येत नाही
म्हणून ते कच्चेच खातात.


या पृथ्वीतलावर
फक्त रोपे आणि झाडेच
हवा, पाणी आणि सूर्यप्रकाश
यांच्या सहाय्याने स्वतःचे अन्न स्वतःच तयार करतात.
आपण काय, नि प्राणी काय कोणालाही
तसे करता येत नाही.
त्यांचे कारण अगदी सोप्पे आहे:
स्वतःचे अन्न स्वतः तयार करण्यासाठी रोपांज़वळ
आणि झाडांजवळ असणारा पानांचा हिरवेपणा
आपल्याजवळ नाही.
म्हणूनच आपण रोपांनी आणि झाडांनी तयार केलेले
अन्न घेऊन ते शिजवून खातो.
आणि प्राणी ते कच्चेच खातात.





हिरव्यागार वनराजीशिवाय
या पृथ्वीवर प्राणीजीवन राहणार नाही.
अर्थात् आपणही इथे असणार नाही.
आपल्याला सुखाने जगता यावे
म्हणून आपण अधिक झाडे आणि रोपे
लावली पहिजेत.






ही हिरवीगार झाडेझुडपे
पहा किती सुंदर दिसतात!
आणि शिवाय ती आपल्याला सावलीही देतात.



आपण आपल्या शेतात भात, गहू
आणि मका लावतो.
बागेत पेरू, आंबा आणि द्राक्षांची लागवड करतो.
शिवाय वांगी, भेंडी, गवार आणि कारली
यांसारख्या भाज्या पिकवतो.

तेव्हा आपण हे लक्षात ठेवले पाहिजे,
झाडे आणि रोपे, लहान असोत वा मोठी,
तो आपलाच एक भाग आहेत,
आणि आपणही त्यांचा एक भाग आहोत.



रु. 9.00

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

